SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

## विद्यार्थी विकास विभाग

Dr. S. G. Ghane
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/589 दि. 21/09/2026

### स्मरणपत्र – १

प्रति,
मा. प्राचार्य /प्रमुख,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण, संस्था
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषयः– सन २०२६–२०२७ या शैक्षणिक वर्षाचे विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत येणाऱ्या विविध शुल्क/निधी रक्कम पाठविणेबाबत.**

संदर्भः– विविध शुल्के भरण्याबाबतचे या विभागाचे संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/४३९ दि. ११/०५/२०२६ रोजीची पत्रे

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात, आपणांस कळविण्यात येते की, या विभागामार्फत घेण्यात येणारी कल्याण निधी, युवक महोत्सव, अपघात/वैद्यकीय मदत निधी, युथ होस्टेल निधी, अविष्कार शुल्क हे **शैक्षणिक वर्ष २०२६ – २०२७ पासून संलग्नता विभागामार्फत दिलेल्या परिपत्रकामधील तारखांनुसार प्रथम सत्र संपण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे निधी/शुल्क विद्यापीठामध्ये खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय शिर्षकामध्ये ऑनलाईन पद्धतीने जमा करण्याबाबत कळविण्यात आले होते.**

| | | | अंदाजपत्रकीय शिर्षक |
|---|---|---|---|
| १ | कल्याण निधी | प्रती विद्यार्थी – रु. १००/–<br>प्रती शिक्षक – रु. ५००/–<br>प्रती प्रशासकीय सेवक – रु. ३००/–<br>प्रती अधिकारी – रु. ५००/–<br>प्रती संस्थाचालक पदाधिकारी – रु. ७००/– | E.3.R.49 |
| २ | युवक महोत्सव | प्रती विद्यार्थी – रु. १००/–<br>(विद्यापीठामध्ये जमा करावयाची रक्कम रु. ६०/– उर्वरीत रु. ४०/– महाविद्यालयाकडे) | A.48.R.2 |
| ३ | अपघात/वैद्यकीय मदत निधी | प्रती विद्यार्थी – रु. २०/– | E.4.R.115 |
| ४ | युथ होस्टेल निधी | प्रती विद्यार्थी – रु. ५०/– | E.4.R.110.1 |
| ५ | अविष्कार शुल्क | प्रती विद्यार्थी – रु. २०/–<br>(विद्यापीठामध्ये जमा करावयाची रक्कम रु. १५/– उर्वरीत रु. ५/– महाविद्यालयाकडे) | A.48.R.10 |

....२

जर महाविद्यालयांनी अद्यापही उपरोक्तप्रमाणे कोणतेही निधी/शुल्क विद्यापीठात भरले नसतील तरी अशा महाविद्यालयांनी उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार निधी/शुल्क **प्रथम सत्र संपण्यापूर्वी** तात्काळ ऑनलाईन पद्धतीने भरुन पावती विद्यार्थी विकास विभागाकडे पाठवून देण्यात यावी हि विनंती.

व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार सन २०२५—२०२६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या महाविद्यालयात **प्रवेशित विद्यार्थ्यांकडून** प्रती विद्यार्थी रु. १००/— याप्रमाणे कल्याण निधी रक्कम घेवून **संलग्नता विभागामार्फत दिलेल्या परिपत्रकामधील तारखांनुसार प्रथम सत्र संपण्यापूर्वी विद्यापीठामध्ये अंदाजपत्रकीय शिर्षक E.3.R.49 या खाती ऑनलाईन पद्धतीने जमा करावयाची आहे.**

**जर प्रथम सत्र संपण्यापुर्वी निधी भरणा केली नाही तर एकूण रक्कमेवर १५% निधीसह रक्कम आकारण्यात येईल. एखादे महाविद्यालय/संस्था दुर्घटना घडल्यानंतर कल्याण निधी रक्कम भरणा करत असल्यास सदर प्रस्तावाची रक्कम + आकारणी केलेली निधी + १५% अतिरिक्त निधी आकारण्यात येईल.**

कळावे,

आपला विश्वासू

संचालक
विद्यार्थी विकास